# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी -- 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

E-Mail: desk19@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: 19/न्यूजलेटर/2016/ ९

दिनांक: 14 JAN 2016

राज्यातील तांत्रिक शिक्षण घेणारे विद्यार्थी , संस्था तसेच संस्थांमधील अध्यापक या सर्वांशी सुसंवाद स्थापित करण्यासाठी व्यापक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या हेतूने तंत्रशिक्षण संचालनालयाने त्रैमासिक ई-न्यूजलेटर प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे. राज्यात २००० पेक्षा जास्त तंत्रशिक्षण देणा-या संस्था, यामधून शिक्षण घेणारे २० लाखाच्या आसपास विद्यार्थी , २०,००० अध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत. या सर्वांच्या शैक्षणिक हितासाठी संस्था आणि उदयोगधंदे,विद्यार्थी,अध्यापक आणि संचालनालय यांच्यामध्ये सुसंवाद व्हावा जेणेकरून या सर्व घटकांना एकत्र येण्यासाठी सामायिक व्यासपीठ मिळेल या हेतूने ई-न्यूजलेटर प्रसिध्द करण्यात येत आहे. या ई-न्यूजलेटर मध्ये तंत्रशिक्षणासंबंधी बातम्या, तंत्रशिक्षणामध्ये होत असलेले नवनवे प्रयोग आणि संशोधन, विवीध परिषदा व राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमार्फत प्रसिध्द होणारे लेखन याचा समावेश असेल.

संस्था आणि संचालनालय यांच्या एकत्रित प्रयत्नातून अनेक घटकांना विवीध घडामोडींशी जोडत त्यांचे तंत्रज्ञानविषयक ज्ञान अद्ययावत ठेवणे हासुध्दा न्यूजलेटरचा उद्देश आहे. प्रसिध्द होणारे प्रत्येक न्यूजलेटर हे एखादी संकल्पना विचारात घेऊन प्रसिध्द करण्यात येईल . महाराष्ट्र राज्यातील तंत्रशिक्षण विषयक विवीध योजना आणि धोरण निश्चित करणारे कॉर्पोरेट जगत,शैक्षणिक आणि उदयोगधंदयांमधील तज्ञ यांचे अभिप्राय किंवा संकल्पना यांचा समावेश न्यूजलेटर मध्ये असेल.

तंत्रशिक्षण संचालनालयाशी संलग्न सर्व संस्थांमधील संचालक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की,त्यांच्या संस्थेशी संबंधित खालील मुद्दयांच्या अनुषंगाने माहिती विस्तृतपणे व उत्तम प्रतीच्या छायाचित्रांसह संचालनालयास पाठवावी.

- संस्थांमार्फत चालवण्यात येणा-या चांगल्या योजना
- संस्थेचे उदयोगक्षेत्राशी असलेले समन्वयाचे कार्य (सामंजस्य करार)
- संस्थेमार्फत आयोजित विवीध कॉन्फरन्स, ट्रेनिंग प्रोग्राम आणि सेमिनार्सची माहिती
- संस्थांकडून करण्यात येणारे नाविन्यपूर्ण संशोधने / कल्पना
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला केंद्रीभूत ठेवून आयोजित करण्यात येणारे शैक्षणिक उपक्रम,शैक्षणिक समुपदेशन,स्पर्धा, प्रोजेक्ट इत्यादी
- संस्थेतील विद्यार्थी, अध्यापक यांना प्राप्त झालेले यश जसे की पुरस्कार/सन्मान/पारितोषिके
- वरील मुद्दयांव्यतिरिक्त् तंत्रशिक्षणाशी संबंधित उल्लेखनीय कामगिरी

वरील माहिती या संचालनालयास दिनांक २५.१.२०१६ किंवा त्यापूर्वी newsletterdte@gmail.com किंवा sbijwe@gmail.com या ई-मेल वर पाठविण्यात यावी. निवडक माहिती आणि उत्कृष्ट प्रतीची छायाचित्रे (High resolution in jpg format) संस्थेच्या नावासह संचालनालयाच्या वतीने प्रसिध्द करावयाच्या आगामी न्यूजलेटरमध्ये समाविष्ट केले जाईल.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

---

क्रमांक:-विकाअ/शिक्षण/न्युजलेटर/२०१६/ 135
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 16 JAN 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-१) सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित, पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन अहवाल संचालनालयास सादर करावा.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

D:\Budage\2016-17\General Correspondence\newletter circular.docx